Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे राष्ट्र उभारणीतील योगदान

**राजकुमार विठ्ठल कडव**

महापुरुषांचे विचार, त्यांचे कार्य इतिहासाला कलाटणी देणारे असतात. त्यामुळे त्यांचा द्रष्टेपणा वर्तमानकाळात अंगीकार करावा लागतो. देशातील महापुरुष हे जातीधर्माला- जोडणारे सेतू आहेत. मानवतेसाठी त्यांनी काम केलेले आहे. ते समान विचारधारेचे होते. त्यातीलच एक अग्रणी विचारवंत, तत्वज्ञ, समाजसुधारक म्हणजे स्वामी विवेकानंद ! पाश्चात्य जगाला आध्यात्मिक विचार सांगणारे स्वामी विवेकानंद हे पहिलेच भारतीय तत्त्वज्ञ म्हणता येतील. प्राचीन काळात अनेक भारतीय तत्ववेत्ते देश - प्रदेशाच्या सीमा ओलांडून बाहेरच्या जगात पोहचल्याची नोंद आहे परंतु कित्येक शतकांच्या निद्रिस्त आणि उच्च - नीचतेच्या बुरसटलेल्या विचारांनी ग्रासलेल्या भारतीय समाजाला अशा हीन अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी पुनश्च भारतीय तत्त्वज्ञानाची ओळख करून दिली ती स्वामी विवेकानंदनीच ! माता भुवनेश्वरीदेवीच्या संस्कारांनी बहरलेल्या स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथे भरलेल्या सर्वधर्मपरिषेदेत वेदांत तत्वज्ञानाची महती सांगतांना मानवाच्या शाश्वत कल्याणाचा मार्ग प्रतिपादन केला. भगिनी निवेदिता म्हणतात, 'हिंदू धर्माचा परिचय करून देण्यासाठी स्वामी विवेकानंद सर्वधर्मपरिषदेत उभे राहिले त्यानंतर हिंदु धर्म एका नव्या स्वरूपात अवतीर्ण झाला.' भारतीय धर्मशास्त्राचा अत्यंत सखोल आणि शास्त्रशुद्ध अभ्यास करून भारतीय संस्कृतीची खरी ओळख स्वामी विवेकानंदांनी सबंध विश्वाला दिली.

खरेतर भारतीय युवा पिढीचे आदर्श असणारे स्वामी विवेकानंद तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, अध्यात्मिक मार्गदर्शक, समाज सुधारक हे काल, आज आणि उद्या साठी एक प्रेरणादायी व्यक्तिमत्व होते आणि असणारही आहेत. भारताच्या इतिहासातील एका संकट पूर्ण संक्रमणाच्या काळात या पराजित, पतित देशाच्या पराकाष्ठेच्या पतनाच्या वेळी ज्या महापुरुषाने धर्मात, समाजात आणि राष्ट्रात महान आदर्शाची स्थापना केली त्याच्या जीवित कार्याचे व संदेशाची ऐतिहासिक महत्त्व कालातीत आहे. राष्ट्रउभारणीच्या कार्यात स्वामी विवेकानंद यांचे योगदान मोलाचे आहे. अनेक विघातक शक्ती देशाच्या विकासामध्ये बाधा आणण्याच्या प्रयत्नात असतांना आजच्या काळात स्वामी विवेकानंदांचे कार्य आणि विचार प्रेरणादायी ठरतात. उपनिषदामधील "उठा, जागे व्हा ! ध्येय साध्य होत नाही तोपर्यंत थांबू नका". हा स्वामी विवेकानंदांमुळे लोकप्रिय झालेला श्लोक प्रत्येक भारतीयाला प्रेरणादायी आहे.

विशेषत आजच्या युवकांना नव्या भारताची उभारणी करण्याची प्रेरणा मिळण्यासाठी स्वामी विवेकानंदांच्या विचारांची आज अत्यंत आवश्यकता आहे. तरुणांमधील सळसळता उत्साह, उर्जा ही खरंतर देशाची खरी संपत्ती. देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी एवढी मोठी ताकत वापरण्याची संधी यापूर्वी कधीच आलेली नव्हती. ती संधी आज आपल्याला मिळाली आहे. स्वामी विवेकानंदांचे विचार

सर्वकालीन सुसंगत आहेत आणि ते दीपस्तंभाप्रमाणे संपूर्ण जगाला मार्गदर्शन करण्याचे काम करत आहेत आणि पुढेही करणार आहेत.

*बिजसंज्ञा - स्वामी विवेकानंद, विचार, वेदांत, योध्दा, संन्यासी, राष्ट्र, भारत, वैश्विक, भारतीय संस्कृती*

**प्रस्तावना Introduction**

स्वामी विवेकानंद यांचे पूर्ण नाव नरेंद्र विश्वनाथ दत्त असे होते. त्यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी झाला. स्वामी विवेकानंद साहित्य, संगीत, कला आणि तत्त्वज्ञान या क्षेत्रांत विशेष रस असणारे व्यक्तीमत्व! विवेकानंद हे पाश्चात्य आणि भारतीय धर्मांशी जोडले गेले होते. त्यांचा सर्वधर्मीय अभ्यास होता. सर्व धर्मांचे सार तत्व एकच आहे अशी त्यांची मान्यता होती. रामकृष्ण परमहंस यांच्या भेटीनंतर त्यांच्या जीवनाला खऱ्या अर्थाने दिशा मिळाली. गुरु रामकृष्ण परमहंस आणि हिंदू सनातन धर्मीय संदेश प्रसारित करण्यासाठी "रामकृष्ण मिशन" स्थापित करण्यात आली. रामकृष्ण मिशनतर्फे त्यांनी वेदांतातील शिकवणीचा प्रसार, गरिबी निर्मूलन तसेच अध्यात्मिक शिकवण शेवटच्या श्वासापर्यंत देण्यात ते यशस्वी झाले. विवेकानंद हे एक द्रष्टे महापुरुष होते. धर्म हा भारतीय जीवनाचा मूलाधार आहे आणि विज्ञानयुगात होरपळणाऱ्या साऱ्या जगाला भारतातील अध्यात्मविचारामुळे शांती लाभणार आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. त्यांनी भारताला स्वतःच्या अस्मितेची जाणीव उत्पन्न करून दिली आणि पाश्चात्य जगाला भारताचा परिचय करून दिला. धर्माबरोबरच शिक्षण, राजकारण, समाजकारण, स्त्रियांची उन्नती, जनसामान्यांचा विकास अशा अनेक विषयांवर त्यांनी मूलगामी विचार व्यक्त केले आहेत. 'जगामध्ये यानंतर श्रमिकांच्या सत्तेचा उदय होणार आहे', हे भविष्यदर्शी उद्गार त्यांनी १८९८ मध्ये काढले. दरिद्रनारायण हा त्यांचा शब्द आहे. त्यांनी त्यागाला सेवेची जोड दिली आणि भारतात आजवर चालत आलेल्या संन्यासाच्या संकल्पनेत मूलभूत क्रांती केली.

भारतातील अध्यात्म आणि पाश्चात्यांचे आधुनिक विज्ञान यांच्या समन्वयातून उद्याची आदर्श मानवसंस्कृती उदयाला येणार आहे, असे त्यांनी म्हटले आहे. बुद्धी व श्रद्धा, विचार आणि भावना, सामर्थ्य आणि करुणा, ऐहिक व आध्यात्मिक यांचा विवेकानंदांइतका उत्कृष्ट समन्वय दुसऱ्या कोणीही साधला नाही .विवेकानंद विज्ञाननिष्ठ होते. वैज्ञानिक तार्किक विचार आणि दृष्टीचा उदय आपल्या देशबांधवांमध्ये व्हावा, त्यांनी डोळस, बुद्धिनिष्ठ व्हावे, खोलसट रूढी परंपरांचा त्यांनी त्याग करावा यासाठी विवेकानंदांनी अथक कष्ट घेतले. भारतीय समाजातील धार्मिक थोथांड आणि कर्मकांड यावर त्यांनी घणाघाती प्रहार केला.

**संधोधन पद्धती Research Method**

प्रस्तुत संशोधनात संशोधन कार्यसाठी ऐतिहासिक विश्लेषण आणि गुणात्मक पद्धतीचा वापर केला गेला आहे .संशोधन कार्यसाठी संशोधन साहित्य प्रसिद्ध पुस्तकांमधून संकलित केले आहे . प्रस्तुत संशोधन कार्य दुय्यम साधनांवर आधारित आहेम्हणून संशोधकाने आधुनिक दृष्टिकोन , .स्वीकारून संशोधन कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे

**संशोधनाची उद्दिष्टे Research Objective**

- स्वामी विवेकानंदांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करणे.
- राष्ट्राच्या नवनिर्माणामध्ये स्वामी विवेकानंदांच्या विचारांचे महत्त्व विषद करणे.

- स्वामी विवेकानंदांच्या मानवतावादी विचारांचा अभ्यास करणे.
- युवकांचे आदर्श म्हणून स्वामी विवेकानंदांचे योगदान समजणे.
- आंतरराष्ट्रीय सामंजस्य संदर्भात स्वामी विवेकानंदांच्या वैश्विक विचारांचे महत्त्व समजणे.
- स्वामी विवेकानंदांच्या शिक्षण संदर्भातील विचारांचे महत्व सिद्ध करणे.
- स्वामी विवेकानंदांच्या स्त्रीशिक्षण संदर्भातील विचारांचा अभ्यास करणे.
- स्वामी विवेकानंद यांच्या आर्थिक व राजकीय विचारांचे महत्त्व समजणे.

स्वामी विवेकानंद हे थोर.भारतीय हिंदू विचारवंत व दार्शनिक होते. तरुणपणी ते रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य झाले आणि रामकृष्णांचा संदेश जनमानसांत पोहचवण्यासाठी त्यांनी रामकृष्ण मिशन सुरू केले. जगामध्ये रामकृष्ण मिशनच्या अनेक शाखा निर्माण केल्या. भारतीय संस्कृतीच्या प्रचार प्रसारासाठी त्यांनी संपूर्ण जगात प्रवास केला. स्वामी हे हिंदू तत्त्वज्ञानाच्या 'वेदान्त' शाखेचे पुरस्कर्ते होते. आद्य शंकराचार्य यांच्या विचारांना पुढे नेत त्यांनी हे तत्त्वज्ञान प्रतिपादित केले. त्यांच्या मते सर्व प्राणिमात्र शिवाचे अंश आहेत, त्यामुळेच 'शिवभावे जीवसेवा' हे रामकृष्ण यांचे वचन त्यांनी शिरोधार्य मानले. ईश्वर अनेक रूपाने तुझ्या समोर उभा आहे. ते सोडून तू कुठे ईश्वराला शोधतोस? जे कोणी प्राणिमात्रांवर प्रेम करतात, तेच ईश्वराची खरी सेवा करतात हेच त्यांचे खरे तत्वज्ञान होते. स्वामी विवेकानंद वेदांतातील अद्वैत तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करीत व विचारप्रधान मानवजातीचा हाच भविष्यकाळात धर्म होणार असे त्यांना निश्चितपणे वाटे. कारण वेदांत केवळ अध्यात्मिक नाही तर तो बुद्धिप्रधानही आहे. मानवी सृष्टीतील वैज्ञानिक शोधांची त्याचा विरोध तर नाहीच उलट सुसंवाद आहे. एखाद्या ईश्वराने हे विश्व निर्मिती नाही ते एक अनंता परब्रम्ह स्वतःच स्वयंभू आहे. स्वतःच्या आविष्कार करीत आहे. स्वतःच्या विलय करीत आहे. मनुष्याच्या ठाई भरलेले स्वयंभू परब्रम्हा व मनुष्य ही वस्तुतः एकच आहेत. जे पिंडी ते ब्रह्मांडी हा वेदांताचा सिद्धांत आहे.

स्वामी विवेकानंदांनी अनेक गोष्टी सांगितल्या परंतु त्यांच्या लेखातून व भाषणातून एक मुख्य सुर होता तो, 'अभय व्हा, निर्भय व्हा, बलवान व्हा!' मनुष्य म्हटला की अधम, पापी अशी त्यांची विचारसरणी मुळीच नव्हती. उलट माणूस म्हणजे परमेश्वराचा अंश त्याला भीती कशाची? जगात एकच पाप आहे ते म्हणजे दुबळेपणा. सर्व प्रकारचे दौर्बल्य झटकून दूर फेका. दौर्बल्य म्हणजे पाप, दौर्बल्य म्हणजे म्हणजे मरण हे त्यांचे मत होते. एखादा उमदा तरुण जर उत्तम चारित्र्याचा, अभ्यासाला वाहिलेला, ज्ञानवान, अशावान, दृढ निश्चयी, बलसंपन्न असा असेल तर त्याला ही सर्व पृथ्वी धनसंपन्न होते. उत्साही, ज्ञानी तरुण कर्तव्यतत्पर असेल तर त्याला पृथ्वीवर सर्व काही सहज साध्य होते. म्हणूनच राष्ट्रउभारणीसाठी बलसंपन्न चरित्र संपन्न युवक माणूस घडवणे हे आमचे परम कर्तव्य होय. 'उठा, जागे व्हा, सद्गुरु पासून आत्मज्ञान मिळवा आणि ते नीट समजून घ्या'. असे स्वामी विवेकानंदांनी आग्रहाने सांगितले.

स्वामी विवेकानंदांनी राजकारण वर्ज्य केले तसेच त्यांच्या समकालीन राजकीय पुढाऱ्यांबद्दल त्यांचे मत काहीसे प्रतिकूल होते. पण समाजाची स्थिती सुधारली पाहिजे सर्वत्र समता, स्वातंत्र्य व बंधुता पाहिजे असा त्यांनी आग्रह धरला. "विचारस्वातंत्र्य, आचार स्वातंत्र्य असणे हा चैतन्याचा, विकासाचा, स्वास्थ्याचा देहस्वभाव आहे, हे स्वातंत्र्य नसेल ती व्यक्ती, ते राष्ट्र विनाश होणार असे नक्की समजावे.

भारतात काही आशास्थान असेल तर ते म्हणजे भारतातला बहुजन समाज! वरिष्ठ वर्ग शारीरिक दृष्ट्या, नैतिक अर्थाने मृतपाय झाला आहे". ते पाश्च्यात्य प्रगतीची हिंदू अध्यात्मिक पार्श्वभूमीशी सांगड घालू पाहत होते. 'समाज असा घडावा की त्याचा धर्म हिंदुत्व व सामाजिक रचना युरोपीय होईल. समता, स्वातंत्र्य, जिज्ञासा, उत्साह, उद्योग या बाबतीत पाश्चमात्यांहून अधिक पाश्चमात्य व्हा, परंतु धार्मिक, संस्कृती व प्रवृत्ती यात शंभर टक्के भारतीय हिंदू राहा' असा त्यांचा आग्रह आहे.

शिक्षणाचे कार्य म्हणजे व्यक्तीच्या ठिकाणी जे ज्ञान आहे त्याचा आविष्कार करणे अशी शिक्षणाविषयी विवेकानंदांची भूमिका होती. त्यांच्या शिक्षणाविषयी संकल्पनेत चरित्र संवर्धनास महत्त्व आहे. शिक्षण हे आत्मविश्वास निर्माण करणारे, विश्वबंधुत्व जोपासणारे, संवेदना जागृत करणारे हवे असे स्वामीजी म्हणत. विवेकानंदांनी स्त्रीशिक्षणाचा जोरदार पुरस्कार केला. स्त्रियांचा उद्धार करण्यासाठी स्त्रियांनीच पुढे आले पाहिजे असे मत मांडले. स्रीशिक्षणाचा प्रचार जनसामान्यात करण्याच्या जबाबदारी सुशिक्षितांवर आहे याची त्यांनी तरुणांना जाणीव करून दिली. जो कोणी हे कार्य करणार नाहीत ते देशद्रोही आहेत असे त्यांनी स्पष्टपणे बजावले.

आधुनिक भारतात स्वामी विवेकानंद हे त्या लोकांपैकी एक आहेत ज्यांनी देशाच्या समस्यांवर पुनर्विचार केला. स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी सामाजिक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात परिणाम केला. अशा परिस्थितीत स्वामी विवेकानंदांचे आर्थिक धोरण व अर्थव्यवस्थेविषयी काय विचार होते ते विचारात घेण्यासारखे आहेत. स्वामी विवेकानंद यांनी गरीब हटविण्याबाबत, कृषी व औद्योगिक विकासाबाबत आणि कामगारांच्या स्थितीबद्दल उघडपणे मत व्यक्त केले. स्वामीजींनी भारताची गरिबीची मुख्य कारण युरोपियन देशांना मानले, ज्यांनी भारताची संपत्ती लुटली आणि भारतातील उद्योगांचा नाश केला. परंतु त्याच वेळी, त्यांनी भारतीय समाजातील जडत्व, दुष्कर्म आणि अंधश्रद्धा यालाही जबाबदार धरले. स्वामी विवेकानंदांनी धार्मिक दुष्कृत्यांवर जोरदार हल्ला केला आणि समाजात श्रमाचे महत्त्व प्रस्थापित केले.

आज असंख्य असे प्रश्न आहेत की त्यांची सोडवणूक आंतरराष्ट्रीय स्तरावरच होणे शक्य आहे. आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय संघ, आंतरराष्ट्रीय कायदे ही आजची गरज आहे. सारे जग एक आहे, एक कुटुंब आहे हे यातून दिसून येत आहे. हीच विशाल दृष्टी जडसृष्टीशास्त्रात अधिकाधिक घ्यावी लागत आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात, "अलग राहून कोणत्याही जातीचा वा देशाचा विकास होणे शक्य नाही. आपल्या अधःपतनाचे मुख्य कारण म्हणजे जगातील इतर राष्ट्रांपासून आपण अलग राहिलो हे आहे आणि आता पुनरुद्धाराचा उपाय हाच की जगाच्या विशाल प्रवाहात पुन्हा शिरावे गती ही जिवंतपणाची खूण आहे." स्वामी विवेकानंदांनी एकदा लिहिले होते, 'मी समाजवादी आहे. तो समाजवाद एक निर्दोष तत्त्वज्ञ आहे म्हणून नव्हे तर मुळीच भाकरी नसण्यापेक्षा अर्धीही बरी. इतर पद्धतीची परीक्षा झाली व ती निकामी ठरली आता या उपायाची कास धरून बघूया. दुसरे काही नाही तरी एक नवीन प्रयोग तरी होईल.'

एक जागतिक किर्तीचा योद्धा संन्यासी अथवा सेनापती एवढीच स्वामी विवेकानंदांची कामगिरी नाही तर भारतीय वेदांत तत्वज्ञान सातासमुद्रपलीकडे घेऊन जाण्याचे कार्य स्वामी विवेकानंदानी केले. स्वामी विवेकानंदांनी तत्वज्ञान, शिक्षण, स्रिउद्धार, राजकारण, समाजवाद, विश्वबंधुत्व, धार्मिक,

आर्थिक अशा सर्वच विषयांवर आपले विचार मांडले. विचार नुसते मांडले नाहीत तर त्यांना प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. रामकृष्ण मिशन व वेदांत सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी गरीब, दुःखी जनात आत्मविश्वस निर्माण केला. धर्मांधता आणि असहिष्णूता हे कोणत्याच धर्माचे घटक असू शकत नाहीत. 'माणूस जसजसा अध्यात्मिक होत जाईल तस तसा तो अधिकाधिक वैश्विक होत जाईल.' असे त्याचे विचार आहेत पण आज आपल्या दुर्दैवाने त्यांच्या या अमृतासम विचारांचा भारतीयांना विसर पडला आहे. त्यांच्या अखिल मानव जातीच्या कल्याणकारी विचारांचा जागर होणे आवश्यक आहे. समाजातील गरीब, दुःखी, कष्टी लोकांबद्दल विवेकानंदांना कणव होती. दारिद्र्यात पिचणाऱ्या आपल्या देशबांधवांमुळे तुम्ही अस्वस्थ झालात तर तुमच्या देशभक्तीची ती पहिली पायरी असेल असे ते म्हणत. स्वामीजी म्हणतात, "ज्या देवाची पूजा आपण सर्वांनी करावयास हवी ते म्हणजे आपले स्वतःचे देशबांधव होत." असा आदर्श, सर्वसामान्यांबद्दल कळवळा असणारा, भारतीय संस्कृतीवर प्रेम असणारा व वैश्विक विचार घेऊन जगाच्या कल्याणाचा विचार देणारा योद्धा ! स्फूर्तिदायक असा हा योद्धा संन्यासी म्हणजे भारतीय तत्वज्ञानाचा मेरुमनी ! त्याचे विचार घेऊन तरुण कार्यसिद्ध करण्यास तत्पर झाले.

**संदर्भ Reference**


चंद्र, विपीन : आधुनिक भारत का इतिहास

पवार, जयसिंगराव : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

नेहरू, पंडित जवाहरलाल : भारताचा शोध

कोळंबे, रंजन : आधुनिक भारताचा इतिहास

वैद्य, सुमन. कोठेकर शांता : आधुनिक भारताचा इतिहास

जोशी, राजेश : आधुनिक भारत - सामान्य अध्ययन

स्वामी विवेकानंद : कर्मयोग

स्वामी विवेकानंद : ज्ञानयोग

स्वामी.विवेकानंद.: भक्तीयोग

स्वामी विवेकांनंद : शिक्षण

रोमा रोला : विवेकानंद

पोतदार, वसंत : योद्धा संन्यासी